जा.क्र.प्रशा/ब—२३/**८०५१**/२०१९
जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर,
दिनांक :— ०४/ ११ /२०१९.

प्रति,

मा.कक्ष अधिकारी (का.७),
विधी व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई—३२.

विषय :— केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
१७ बाबींवरील माहिती अद्ययावत करण्याबाबत....

संदर्भ :— १) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक कें.मा.आ १००८/प्र.क्र.४८/का.७, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, दि.०२ नोव्हेंबर, २०१०.

२) महाराष्ट्र शासन, पत्र क्र.केंमाअ २०१२/प्र.क्र.११/का.७, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १४ फेब्रुवारी, २०१४.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपल्या विभागाने संदर्भीय शासन निर्णयान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ४ अंतर्गत खुद्द विभागाची व विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांबाबतची १७ बाबींची माहिती विहित नमुन्यात प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस Hard copy व Soft copy स्वरुपात आणि संकेतस्थळावर उपलब्ध करणेबाबत सूचित केले होते.

सबब, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील प्रकरण दोन माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने नियम ४ (१) (क) (ख) नुसार १७ बाबींवरील जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर या कार्यालयाची **सन २०१९—२०२०** या कालावधीतील अद्ययावत माहितीची एक प्रत सी.डी. सह यासोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/—
( एम. आर. देशपांडे )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सोलापूर.

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, सोलापूर.

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४(१)(ब) अंतर्गत १७ बाबींची जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूरबाबत माहिती.

बाब क्रमांक : १:— सोलापूर येथील सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामाचा व कर्तव्याचा तपशिल

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | सार्वजनिक प्राधिकरणाचे नांव व पत्ता. | : | जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर, जिल्हा सोलापूर. |
| ब. | कार्यालय प्रमुख | : | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर. |
| क. | कोणत्या खात्याच्या अंतर्गत हे कार्यालय आहे. | : | विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई—३२ |
| ड. | कामाचा अहवाल कोणत्या कार्यालयाकडे सादर केला जातो. | : | उच्च न्यायालय, मुंबई — ३२. |
| इ. | सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय: अंतर्गत असणारे सत्र विभाग, दिवाणी न्यायालये, व.स्तर व दिवाणी न्यायालये, क.स्तर यांची स्थानिक व तालुकानिहाय असलेली न्यायालये/कार्यालये यांची माहिती व त्यांच्या कार्यकक्षा. | | |

अ) सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय(मुख्यालय):—आजमितीस सोलापूर स्थानिक मुख्यालयाच्या ठिकाणी खालील न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश. | १ |
| २ | जिल्हा न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश | ५ |
| ३ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश | १ |
| ४ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | ७ |
| ५ | मुख्य न्यायदंडाधिकारी | १ |
| ६ | सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १३ |

सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील अपीलीय व सत्र विभागाच्या कामकाजाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र सोलापूर शहर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट व मोहोळ या महसूली तालुक्यांकरिता आहे.

सोलापूर येथील दिवाणी न्यायालय, व. स्तर या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र सोलापूर शहर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ या महसूली तालुक्यांकरिता आहे.

सोलापूर येथील दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांचे न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र सोलापूर शहर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर या महसूली तालुक्यांकरिता आहे.

ब) <u>पंढरपूर सत्र विभाग</u> :—

पंढरपूर येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक CRC 3288/1145/(131)-(i)-XVI, दिनांक ३१/८/१९८९ नुसार दिनांक १/१०/१९८९ पासून पंढरपूर, मंगळवेढा, व सांगोला या तालुक्याकरिता एक सत्र विभाग स्थापन करणेत आलेला आहे. पंढरपूर येथील अप्पर जिल्हा व सत्र न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र पंढरपूर, मंगळवेढा व सांगोला या महसूली तालुक्यापुरती मर्यादित आहे.

तसेच पंढरपूर येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक CRC 3288/1145/(131)-(i)-XVI, दिनांक ३१/८/१९८९ नुसार दिनांक १/१०/१९८९ पासून दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, या न्यायालयाची स्थापना झालेली होती व सदरहू न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र पंढरपूर, मंगळवेढा व सांगोला या महसूली तालुक्यांपुरती मर्यादित आहे आणि दिवाणी न्यायालय, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र पंढरपूर तालुका अशी आहे.

आजमितीस पंढरपूर येथे खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश | २ |
| २ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश | ० |
| ३ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | ४ |
| ४ | सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.श्रेणी | ३ |

क) <u>माळशिरस सत्र विभाग</u>ः—

माळशिरस येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक CRC 3298/(340/98)-XI, दिनांक ०९/१२/२००४ नुसार दिनांक १८/१२/२००४ पासून माळशिरस या महसूली तालुक्याकरिता एक सत्र विभाग स्थापन झाला असून तेथील अपर जिल्हा व सत्र न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र माळशिरस या महसूली तालुक्यापुरती मर्यादित आहे. तसेच माळशिरस येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक CRC 3298/ (340/98)-XI, दिनांक ०९/१२/२००४ नुसार दिनांक १८/१२/२००४ पासून दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, या न्यायालयाची स्थापना झालेली असून सदरहू न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र माळशिरस या महसूली तालुक्यांपुरती मर्यादित आहे आणि दिवाणी न्यायालय, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र माळशिरस तालुका अशी आहे. माळशिरस येथे आजमितीस खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश | १ |
| २ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | १ |
| ३ | सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | ३ |

ड) <u>बार्शी विभाग</u>ः—

बार्शी येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक PaDaNi-0714/C.R.138/D-11, दि.२४.०९.२०१४ नुसार दि.२७.०९.२०१४ पासून सत्र विभाग स्थापन झाला असून तेथील अपर जिल्हा व सत्र न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र बार्शी आणि करमाळा या महसूली तालुक्यापुरती मर्यादित आहे.

बार्शी येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र.CRC2292/(413/98)-(I)-XI,दि.२२/०८/२००२ नुसार दि.२४/०८/२००२ पासून दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, या न्यायालयाची स्थापना झालेली असून सदरहू न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र बार्शी, करमाळा, माढा या महसूली तालुक्यांपुरती मर्यादित आहे. दिवाणी न्यायालय, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, बार्शी या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र बार्शी तालुका अशी आहे. आजमितीस बार्शी येथे खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश | १ |
| २ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश | १ |
| ३ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | ३ |
| ३ | सहदिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | २ |

इ) मोहोळ, माढा, सांगोला, मंगळवेढा, अक्कलकोट, करमाळा या वर नमूद तालुक्यांच्या ठिकाणी खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ. नं. | तालुक्याचे ठिकाण | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|---|
| १ | मोहोळ | १. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| | | २. सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| २ | माढा | १. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| | | २. सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| | | ३. २रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| | | ४. ३रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| ३ | सांगोला | १. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| | | २. सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| | | ३.२रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.श्रेणी | १ |
| | | ४.३रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.श्रेणी | १ |
| ४ | मंगळवेढा | १. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| | | २. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| ५ | अक्कलकोट | १. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| | | २. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| ६ | करमाळा | १. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| | | २. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |

वर नमूद केलेल्या सर्व न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र त्या त्या तालुक्यांपुरती मर्यादित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| फ. | ध्येय/धोरण | : | कायद्यातील तरतुदीनुसार न्याय देणे. |
| ग. | प्रत्यक्ष कार्य | : | दिवाणी व फौजदारी प्रकरणे तसेच मोटार अपघात प्रकरणात न्यायनिर्णय करणे. याशिवाय विधी सेवा प्राधिकरणामार्फत गरजू व गरीब पक्षकारास मोफत कायदेविषयक सल्ला व सहाय्य देणे. |
| ह. | स्थावर मालमत्ता (येथे प्राधिकरणाची जमीन/इमारत आणि अन्य स्थावर मालमत्तेचातपशिल) | : | |

सोलापूर येथे जिल्हा व सत्र न्यायालय आणि दिवाणी व फौजदारी न्यायालय अशा दोन स्वतंत्र इमारती आहेत तसेच जलदगती न्यायालयासाठी एक इमारत आहे. या सर्व इमारती जिल्हा न्यायालयाचे आवारात असून त्यांची मालकी जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर या कार्यालयाची आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

१) <u>जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर.</u>:—जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर या इमारतीमध्ये कार्यरत असलेली न्यायालये.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर. | १ |
| २ | जिल्हा न्यायाधीश १ व अति. सत्र न्यायाधीश, सोलापूर | १ |
| ३ | जिल्हा न्यायाधीश २ व अति. सत्र न्यायाधीश, सोलापूर | १ |
| ४ | जिल्हा न्यायाधीश ४ व अति. सत्र न्यायाधीश, सोलापूर | १ |
| ५ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१ व अति. सत्र न्यायाधीश, सोलापूर | १ |
| ६ | २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, सोलापूर | १ |
| ७ | ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सोलापूर | १ |
| ८ | ७ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सोलापूर | १ |
| ९ | ८ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सोलापूर | १ |
| १० | १० वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सोलापूर | १ |

२) <u>जलदगती न्यायालय इमारत, सोलापूर</u> :—

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश—३ व अति.सत्र न्यायाधीश, सोलापूर | १ |
| २ | जिल्हा न्यायाधीश—५ व सहा.सत्र न्यायाधीश, सोलापूर | १ |
| ३ | जिल्हा न्यायाधीश—६ व अति.सत्र न्यायाधीश, सोलापूर (रिक्त) | १ |

३) <u>दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोलापूर.</u>:— दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोलापूर या इमारतीमध्ये कार्यरत असलेली न्यायालये.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, सोलापूर | १ |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, सोलापूर. | १ |
| ३ | ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, सोलापूर. | १ |
| ४ | ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, सोलापूर. (रिक्त) | १ |
| ५ | मुख्य न्यायदंडाधिकारी, सोलापूर. | १ |
| ६ | सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सोलापूर. (कोर्ट नं.२) | १ |
| ७ | ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सोलापूर. | १ |
| ८ | ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सोलापूर. (कोर्ट नं.३) | १ |

सोलापूर येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर व ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर ही दोन्ही न्यायालये दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे लगत असलेल्या स्वतंत्र जागेत चालतात.

सोलापूर येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर ही दोन्ही न्यायालये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या इमारतीलगत असलेल्या स्वतंत्र जागेत चाालतात.

सोलापूर येथील दारूबंदी न्यायालयाचे ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, सोलापूर हे न्यायालय दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे लगत असलेल्या स्वतंत्र इमारतीत चाालतात.

सोलापूर शहरात सोलापूर महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये म्युनिसिपल न्यायालयाचे कामकाज चालते

३) सोलापूर मुख्यालयाचे ठिकाणी न्यायिक अधिका—यांसाठी अधिनस्त (Assigned Residential Quarter) शासकीय निवासस्थाने खालीलप्रमाणे उपलब्ध आहेत.

| अ. नं. | अधिका—यांचा हुद्दा | निवासस्थानाचे नांव | संख्या | निवासस्थानाचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर | कस्तुरी | १ | गांधीनगर, सिव्हील लाईन्स, सोलापूर. |

| अ. नं. | अधिका—यांचा हुद्दा | निवासस्थानाचे नांव | संख्या | निवासस्थानाचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| २ | जिल्हा न्यायाधीश—१, सोलापूर | श्रध्दा | १ | न्यायाधीश निवास, अधिक्षक अभियंता सार्व.बांधकाम मंडळ, कार्यालयाजवळ,गुरुनानक चौक, सोलापूर |
| ३ | जिल्हा न्यायाधीश—२, सोलापूर | पूजा | १ | न्यायाधीश निवास, अधिक्षक अभियंता सार्व.बांधकाम मंडळ, कार्यालयाजवळ,गुरुनानक चौक, सोलापूर |
| ४ | जिल्हा न्यायाधीश—३, सोलापूर | भक्ती | १ | न्यायाधीश निवास, अधिक्षक अभियंता सार्व.बांधकाम मंडळ, कार्यालयाजवळ,गुरुनानक चौक, सोलापूर |
| ५ | जिल्हा न्यायाधीश—४, सोलापूर | मालकंस | १ | न्यायाधीश निवास, अधिक्षक अभियंता सार्व.बांधकाम मंडळ, कार्यालयाजवळ,गुरुनानक चौक, सोलापूर |
| ६ | जिल्हा न्यायाधीश—५, सोलापूर | रागेश्री ३ | १ | न्यायाधीश निवास, अधिक्षक अभियंता सार्व.बांधकाम मंडळ, कार्यालयाजवळ,गुरुनानक चौक, सोलापूर |
| ७ | जिल्हा न्यायाधीश—६, सोलापूर | चंद्रकंस | १ | न्यायाधीश निवास, अधिक्षक अभियंता सार्व.बांधकाम मंडळ, कार्यालयाजवळ,गुरुनानक चौक, सोलापूर |
| ६ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१, सोलापूर | —— | — | भाडेतत्वावर खाजगी निवासस्थानामध्ये वास्तव्यास. |
| ९ | १) ११वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोलापूर, २) ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोलापूर, ३) मुख्य न्यायदंडाधिकारी, सोलापूर, ४) सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, म्युनि. कोर्ट, सोलापूर | प्रसाद १ ते ४ | ४ | न्यायाधीश निवास, अधिक्षक अभियंता सार्व.बांधकाम मंडळ, कार्यालयाजवळ,गुरुनानक चौक, सोलापूर |

| अ. नं. | अधिका–यांचा हुद्या | निवासस्थानाचे नांव | संख्या | निवासस्थानाचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| १० | १) १२वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोलापूर, २) ८वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोलापूर, ३) १०वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोलापूर, ४) ९वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोलापूर, | बागेश्री १ ते ४ | ४ | न्यायाधीश निवास, गांधीनगर, सिव्हील लाईन्स, सोलापूर. |
| ११ | १) ४थे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सोलापूर, २) सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोलापूर, ३) धर्मदाय उपायुक्त, सोलापूर, ४) ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोलापूर, ५) सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर, ६) ५वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सोलापूर. | सुरश्री १ ते ६ | ६ | न्यायाधीश निवास, गांधीनगर, सिव्हील लाईन्स, सोलापूर. |
| १२ | १) ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सोलापूर, २) सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सोलापूर, ३) जि. न्या.–५,सोलापूर, ४) २रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सोलापूर, | रागेश्री १ ते ४ | ४ | न्यायाधीश निवास, गांधीनगर, सिव्हील लाईन्स, सोलापूर. |
| १२ | ६वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोलापूर, | ममता, क्यू–१ | १ | कुमठा नाका, सोलापूर. |
| १३ | ७वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोलापूर, | रंगभवन, पी–६४ | १ | रंगभवन, सोलापूर. |

वर नमूद निवासस्थाने ही न्यायीक अधिकारी यांचेकरीता अभिहस्तांकित शासकीय निवासस्थान असून ती जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे अधिपत्याखाली आहेत.

खालील न्यायीक अधिकारी हे शहर सोलापूर येथे खाजगी निवासस्थान भाडे तत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

१. २रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सोलापूर
२. ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,सोलापूर

४) पंढरपूर येथील नव्याने बांधण्यात आलेल्या जिल्हा व सत्र न्यायालयाचे इमारतीचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभाग,पंढरपूर या कार्यालयाकडून जिल्हा न्यायाधीश—१,पंढरपूर यांनी दिनांक ०१/०८/२०१५ रोजी घेतलेला आहे. सदर नवीन न्यायालयीन इमारतीचा उदघाटन सोहळा दि. ०८/०८/२०१५ रोजी संपन्न होवून सदर इमारतीमध्ये पंढरपूर येथील न्यायालयीन कामकाज सुरु आहे. सदरहू इमारतीमध्ये खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश—१ व अति. सत्र न्यायाधीश, पंढरपूर | १ |
| २ | जिल्हा न्यायाधीश—२ व अति. सत्र न्यायाधीश, पंढरपूर | १ |
| ३ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, पंढरपूर | १ |
| ४ | सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, पंढरपूर | १ |
| ५ | २ रे सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, पंढरपूर | १ |
| ६ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, पंढरपूर | १ |
| ७ | सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर | १ |
| ८ | २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर | १ |
| ९ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर | १ |
| १० | अतिरिक्त सह जिल्हा व सत्र न्यायाधीश, पंढरपूर | १ |

पंढरपूर येथे खालील न्यायीक अधिकारी अभिहस्तांकित शासकीय निवासस्थानामध्ये वास्तव्यास आहेत.

१. जिल्हा न्यायाधीश—१, पंढरपूर
२. जिल्हा न्यायाधीश—२, पंढरपूर
३. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर
४. ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर

तसेच, पंढरपूर येथे खालील न्यायीक अधिकारी खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

१. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पंढरपूर
२. सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पंढरपूर
३. २रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पंढरपूर
४. ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पंढरपूर
५. २रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,पंढरपूर
६. अति. सह जिल्हा न्यायाधीश, पंढरपूर.

५) माळशिरस येथे अपर जिल्हा व सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायालयाची एक स्वतंत्र व दिवाणी न्यायालय, क. स्तर न्यायालयाची एक स्वतंत्र अशा इमारती असून दिवाणी न्यायालय, क. स्तर न्यायालयाचे इमारतीमध्ये एकूण ३ न्यायालये कार्यरत आहेत.

माळशिरस न्यायालयाकरीता सध्याची न्यायालयीन इमारत अपूरी असल्यामुळे, माळशिरस येथे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश व दिवाणी न्यायाधीश, व.स्तर यांचे नवीन न्यायालयीन इमारतीसाठी व न्यायीक अधिका—यांचे निवासस्थानासाठी जागा संपादित करणेकामी या कार्यालयाकडून मा. उच्च न्यायालय,मुंबई, मा. महाराष्ट्र शासन,विधि व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई आणि मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेबरोबर आवश्यक तो पत्रव्यवहार/ पाठपुरावा करण्यात आलेला होता. त्या अनुषंगाने विधि व न्याय विभाग,मंत्रालय, मुंबई पत्र क्र. बैठक/०४१४ /६६१/प्र.क्र.१२०/कार्या/११ दिनांक २३/०७/२०१४ सोबत मा. राज्यमंत्री (विधि व न्याय) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७/०७/२०१४ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तात मा. राज्यमंत्री यांनी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी माळशिरस जिल्हा सोलापूर येथील कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या मालकीची जमीन गट नं. २१०६/१—अ मधील १ हेक्टर क्षेत्र या जमीनीचा आगाऊ ताबा मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे न्यायालयीन इमारतीचे बांधकामासाठी देण्यात यावा आणि सदर जमीनीची रुपये १,६१,४४,५००/— इतकी रक्कम आगामी हिवाळी अधिवेशनात पूरवणी मागणी द्वारे कृष्णा खोरे विकास महामंडळास देण्यात यावी असे निर्देश केले होते.

त्याअनुषंगाने, जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाकडून मा.जिल्हाधिकारी, सोलापूर, मा.अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन,मंगळवार पेठ,पुणे—११ आणि कार्यकारी संचालक, महा.कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांचेबरोबर आवश्यक तो पत्रव्यवहार करण्यात आलेला होता.

मा. डॉ. प्रविणकुमार देवरे,अप्पर जिल्हाधिकारी,सोलापूर यांचा आदेश क्र. २०१४/महसूल/कार्या—३/नभू—२/आरआर/६९८/एसआर/७९,दिनांक १०/०९/१४ (जिल्हाधिकारी कार्यालया,सोलापूर महसूल शाखा,कार्यासन क्रमांक ३) अन्वये महा. शासनातर्फे तहसिलदार माळशिरस यांनी महा.कृष्णा खोरे विकास महामंडळाकडील मौजे माळशिरस, ता. माळशिरस येथील जमीन गट नं.

२१०६/१—अ/१ मधील ४७/०६ पैकी ३१ हेक्टर ९३ आर पैकी १ हेक्टर क्षेत्राचा ताबा २९/१०/२०१४ रोजी महाराष्ट्र शासनाकडून मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,सोलापूर यांचेतर्फे माळशिरस येथील मा.जिल्हा न्यायाधीश—१ यांना दिलेला आहे.

अधिक्षक अभियंता,पुणे पाटबंधारे मंडळ,पुणे—११ यांनी सह सचिव विधि व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांना पत्र क्र. पुपामं/अलि—७/१७/२०१६ दिनांक १५/०२/२०१६ अन्वये विषयांकित कामी माळशिरस न्यायालयाकरीता संपादन केलेल्या जमीनीची किंमत रुपये १,६१,४४,५००/— तातडीने महा.कृष्णा खोरे विकास महामंडळास वर्ग होणेबाबत विनंती करुन सदर पत्राची एक प्रत जिल्हा न्यायालय,सोलापूर कार्यालयास अग्रेषित केलेली होती.

त्याअनुषंगाने जिल्हा न्यायालय, सोलापूर पत्र क्र. प्रशा/ड—१/२१४९/२०१६ दि. २३/०३/२०१६ अन्वये या कार्यालयाने माळशिरस, जिल्हा सोलापूर येथील प्रस्तावित नीवन न्यायालयीन इमारत व न्यायीक अधिकारी यांची अभिहस्तांकित शासकीय निवासस्थाने बांधण्यासाठी संपादित केलेल्या जमीनीची किंमत रक्कम रुपये १,६१,४४,५००/—महा.कृष्णा खोरे विकास महामंडळास वर्ग करण्याची कार्यवाही होणेबाबत मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग मंत्रालय, महा.शासन, मुंबई यांना मा. महाप्रबंधक उच्च न्यायालय अपील शाखा,मुंबई मार्फत विनंती केली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून करण्यात आलेल्या सूचनांचे अनुषंगाने माळशिरस येथील प्रस्तावित नवीन न्यायालयीन इमारत बांधणेकामी सुधारीत नकाशे व अंदाजपत्रके सादर करण्याचे काम अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,सोलापूर/कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग,अकलूज यांचेकडून प्रगतीपथावर आहे.

माळशिरस येथे खालील न्यायीक अधिकारी अभिहस्तांकित शासकीय निवासस्थानामध्ये वास्तव्यास आहेत.

१. जिल्हा न्यायाधीश—१, माळशिरस
२. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,माळशिरस
३. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माळशिरस
४. २ रे सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर, माळशिरस

तसेच, माळशिरस येथे ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माळशिरस हे खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

६) बार्शी येथे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाकरीता स्वतंत्र अशी इमारत आहे.

तसेच, बार्शी येथील दिवाणी न्यायालय, व. स्तर या न्यायालयाची इमारत ही भाडेतत्वावर असून तेथे दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बार्शी यांचे न्यायालय कार्यरत आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश तसेच महाराष्ट्र शासन विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई अधिसूचना क्र.PaDaNi-0714/C.R.131/Desk-XI, दि.२८ ऑगस्ट, २०१४ व अधिसूचना क्र.PaDaNi-0714/C.R.138/Desk-XI, दि.२४ सप्टेंबर,२०१४ अन्वये बार्शी, जिल्हा सोलापूर येथे दिनांक २९ सप्टेंबर,२०१४ रोजी नव्याने जिल्हा न्यायाधीश—१ व अति.सत्र न्यायाधीश,बार्शी या न्यायालयाची स्थापना करण्यात येवून बार्शी येथे जिल्हा न्यायालय व अति.सत्र न्यायालयाची कामकाज चालू झालेले आहे.

सद्यस्थितीस दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाकरीता असलेल्या इमारतीमध्ये २ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, २ सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बार्शी आणि जिल्हा न्यायाधीश—१ व तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१, बार्शी यांची न्यायालये कार्यरत आहेत. सदर इमारत ही न्यायालयीन तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता अत्यंत अपुरी पडत आहे.

बार्शी येथे नवीन न्यायालयीन इमारतीसाठी व कर्मचारी निवासस्थानासाठी गट नं. १०८८/११—अे, क्षेत्र हे ४—२० आर ही मिळकत/खुली जागा दि.२९/९/९५ रोजी न्याय खात्याचे ताब्यात मिळालेली आहे. सध्या चालू असलेल्या न्यायालयीन कामकाजाची इमारत आणि भूसंपादन केलेली जागा यांमधील अंतर जवळपास दोन ते अडीच कि.मी. इतके आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून करण्यात आलेल्या सूचना तसेच, निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने बार्शी येथील प्रस्तावित नवीन न्यायालयीन इमारत बांधणेकामी सुधारीत नकाशे व अंदाजपत्रके सादर करण्याचे काम अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर/कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर यांचेकडे प्रलंबित आहे.

बार्शी येथे न्यायीक अधिकारी यांचेकरीता असलेल्या अभिहस्तांकित शासकीय निवासस्थानामध्ये खालील न्यायीक अधिकारी वास्तव्यास आहेत.

१. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, बार्शी
२. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, बार्शी

नगरपरिषद बार्शी यांचे मालकीची इमारत मा. जिल्हा न्यायाधीश—१, बार्शी यांचेकरीता भाडेतत्वावर घेतलेली असून, सदर इमारतीमध्ये तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१, बार्शी वास्तव्यास आहेत.

जिल्हा न्यायाधीश या पदाचे अतिरीक्त/तात्पूरत्या न्यायालयाचे न्यायाधीशांकरीता बार्शी येथे भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या अभिहस्तांकित निवासस्थानामध्ये अति. सह जिल्हा न्यायाधीश, बार्शी वास्तव्यास आहेत.

तसेच, बार्शी येथे खालील न्यायीक अधिकारी खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

१. जिल्हा न्यायाधीश—१,बार्शी
२. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बार्शी
३. सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बार्शी
४. २रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बार्शी
५. ३रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,बार्शी

७) सांगोला येथील आरक्षण क्र. ४३/अ, क्षेत्र हे १—४३ आर व गावठाणातील आरक्षण क्र. ४४, क्षेत्र हे. ०—४७ आर. असे एकूण हे १—९३ आर क्षेत्र मिळकतीचा ताबा न्याय खात्याकडे असून सदर जागेवर नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम होवून दि. १९/११/२००९ पासून सदर इमारतीमध्ये दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग या पदांच्या ४ न्यायालयांचे कामकाज चालू आहे.

सांगोला येथे खालील न्यायीक अधिकारी हे अभिहस्तांकित शासकीय निवासस्थानामध्ये वास्तव्यास आहेत.

१. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सांगोला
२. २रे सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर, सांगोला

सांगोला येथे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, सांगोला व ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, सांगोला हे न्यायीक अधिकारी खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

८) मोहोळ येथे न्यायालयाची स्वतंत्र इमारत असून त्यामध्ये २ न्यायालये कार्यरत आहेत.

मोहोळ येथे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर या पदाचे न्यायीक अधिका—यांकरीता एक अभिहस्तांकित शासकीय निवासस्थान असून तेथे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मोहोळ वास्तव्यास आहेत तसेच सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मोहोळ हे खाजगी निवासस्थान भाडे तत्वावर घेवून मोहोळ येथे वास्तव्यास आहेत.

९) मंगळवेढा येथे जुन्या न्यायालयीन इमारतीत एक दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर अशी एकूण ०२ न्यायालये कार्यरत आहे. मंगळवेढा येथील भूखंड सि.स.नंबर २७१ पैकी आरक्षण नंबर ५४ चे क्षेत्र ०.८६ आर=४७० चौ.मी.या जागेचा कब्जा दिनांक १६/१०/९५ रोजी मिळाला आहे. महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचा शासन निर्णय दिनांक २८ जानेवारी, २०११ अन्वये मंगळवेढा येथे न्यायालयीन इमारत बांधण्याच्या रुपये २,७९,९८,६७१/—इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास प्रशासकिय मान्यता मिळालेली असून सदर न्यायालयीन इमारतीचा कोनशिला समारंभ दिनांक २५/१२/२०११ रोजी संपन्न होवून, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, कार्यालयाचे अधिपत्याखाली मंगळवेढा येथील नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

अधिक्षक अभियंता, सार्व. बांधकाम मंडळ, सोलापूर कार्यालयाकडून मंगळवेढा येथील नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकामाचा सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सादर केलेला रुपये ०३,९८,७८,३४४/— इतक्या रक्कमेचा प्रस्ताव जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयास प्राप्त झालेला होता. सदर प्रस्ताव जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाने पुढील उचित कार्यवाहीस्तव मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे मार्फत मा. प्रधान सचिव, विधि व परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अग्रेषित केला आहे.

अधिक्षक अभियंता, सार्व.बांधकाम मंडळ, सोलापूर/कार्यकारी अभियंता,सार्व.बांधकाम विभाग,पंढरपूर यांचेकडून नवीन न्यायालयीन इमारतीचा ताबा न्याय खात्यास देण्यायोग्य आहे असे मत झाल्यास त्याअनुषंगाने सविस्तर अहवाल जिल्हा न्यायालय,सोलापूर कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर, जिल्हा न्यायालय,सोलापूर कार्यालयाकडून पुढील उचित व आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

मंगळवेढा येथे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर या पदाचे न्यायीक अधिका—यांकरीता एक अभिहस्तांकित शासकीय निवासस्थान असून तेथे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मंगळवेढा वास्तव्यास आहेत तसेच, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मंगळवेढा हे खाजगी निवासस्थान भाडे तत्वावर घेवून मंगळवेढा येथे वास्तव्यास आहेत.

१०) सद्य:स्थितीस **माढा** येथे गट नं. ३६०ए सि.स.नं.२०८६ जुन्या न्यायालयीन इमारतीचे लगत गट नंबर ३५९/१ अ, ६ हे. १२ आर. या जागेत नविन न्यायालयीन इमारत बांधणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचा शासन निर्णय दिनांक २२ एप्रिल, २०१० अन्वये माढा येथे न्यायालयीन इमारत बांधण्याच्या रक्कम रु. २,२६,३५,८७२/— इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास प्रशासकिय मान्यता मिळालेली होती. कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग क्र. २, सोलापूर कार्यालयाकडून माढा येथे नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले होते.

सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२,सोलापूर यांचेमार्फत तालुका माढा येथे करण्यात आलेल्या नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे

असलेबाबत व बांधकामामध्ये अनेक त्रुटी असलेबाबत माढा येथील विधिज्ञ मंडळी तसेच दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, माढा यांनी जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयास कळविलेवरुन विषयांकित कामी मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच महाराष्ट्र शासन आणि मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,पुणे यांचेबरोबर आवश्यक तो पत्रव्यवहार वेळोवेळी करण्यात आलेला होता.

त्याअनुषंगाने माढा येथील नवीन न्यायालयीन इमारतीची तपासणी सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,पुणे कार्यालयाच्या अधिपत्याखाली दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांचेकडून होवून काढण्यात आलेल्या त्रुटींप्रमाणे नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये आवश्यक कार्यवाही करण्यात येवून, माढा येथील नवीन न्यायालयीन इमारत न्यायखात्याच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही योजन्यात यावी असा अहवाल मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांनी सादर केल्यानंतर, कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग क्र. २, सोलापूर आणि उपअभियंता सार्व. बांधकाम विद्युत उपविभाग, सोलापूर यांनी सादर केलेल्या चेक लिस्ट प्रमाणे माढा येथील नवीन न्यायालयीन इमारतीचा रितसर ताबा दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माढा यांचेकडून दिनांक १९/०१/२०१७ रोजी घेण्यात येवून, नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये न्यायालयीन तसेच कार्यालयीन कामकाज दि. २७/०२/२०१७ पासून सुरु झाले आहे.

सद्य:स्थितीस माढा येथे जुनी न्यायालयीन इमारत तसेच त्यालगत बांधण्यात आलेल्या नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये दिवाणी न्यायाधिश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, या न्यायालयाचे कामकाज चालू आहे. माढा येथे सध्या एकूण ०४ न्यायालयांचे कामकाज चालू आहे.

माढा येथे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर हे शासकीय निवासस्थानात वास्तव्यास आहेत तसेच २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माढा आणि ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माढा हे खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून माढा येथे वास्तव्यास आहेत.

११) अक्कलकोट येथे दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यापदाची २ न्यायालये सद्य:स्थितीस कार्यरत आहेत.

सध्याची न्यायालयीन इमारत व आवार न्यायालयीन/कार्यालयीन कामकाज चालविणेकामी अपुरे पडत असल्यामुळे जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाकडून वेळोवेळी मा. उच्च न्यायालय,मुंबई तसेच मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेबरोबर आवश्यक पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. १७/०४/२०१७ मधील सूचनांप्रमाणे जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाने पत्र क्र. प्रशा/ड–१/३२४८, दिनांक १९/०४/२०१७ अन्वये मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांना आवश्यक पत्रव्यवहार करुन मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सूचविलेला भूखंड न्याय

खात्यास नवीन न्यायालयीन इमारत व न्यायीक अधिकारी यांची निवासस्थाने बांधणेकामी न्याय खात्यास लवकरात लवकर हस्तांतरीत होवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. विषयांकित कामी आवश्यक व तातडीची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाकडे प्रलंबित आहे.

अक्कलकोट येथे दिवाणी न्यायाधीश, क.स्तर या पदाचे न्यायीक अधिका—यांकरीता एक अभिहस्तांकित शासकीय निवासस्थान असून तेथे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, अक्कलकोट वास्तव्यास आहेत, तसेच सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, अक्कलकोट हे खाजगी निवासस्थान भाडे तत्वावर घेवून अक्कलकोट येथे वास्तव्यास आहेत.

१२) करमाळा येथील सि.स.नं. ३९२२, क्षेत्र हे १—१६ आर या मिळकतीचा ताबा न्याय खात्याकडे असून सदर जागेवर नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम होवून ०३ मार्च २००९ पासून सदर इमारतीमध्ये दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग या पदांच्या २ न्यायालयांचे कामकाज चालू आहे.

करमाळा येथे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचेकरीता शासकीय निवासस्थान आहे. परंतु स्टक्चरल ऑडीटमध्ये सुचविण्यात आलेल्या दुरुस्तीकामे होईपावेतो सदर निवासस्थानामध्ये राहू नये असे कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग, अकलूज यांनी कळविल्यामुळे आवश्यक दुरुस्त्या/कामे होईपावेतो अभिहस्ताकींत शासकिय निवासस्थान रिक्त ठेवण्यात आले आहे.

दिवाणी न्यायाधिश क. स्तर, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, करमाळा हे खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून करमाळा येथे वास्तव्यास आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ई. | कार्यालयाची वेळ व दूरध्वनी क्र./पत्ता/ई मेल | : | १. न्यायिक अधिकारी व कर्मचा—यांकरिता कार्यालयाची वेळ :—<br>सकाळी १०.३० ते सायं ६.०० वाजेपावेतो.<br><br>२. दूरध्वनी क्रमांक ०२१७—२६२७०७७<br><br>३. ई मेल पत्ता :—mahshodc@mhstate.nic.in |

| | | | |
|---|---|---|---|
| ज. | सप्ताहीक सुट्टी | : | रविवार तसेच प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार या दिवशी कार्यालयास सुट्टी असते. तथापि सदर सुट्टयात लोकन्यायालये, शिबिरे व न्यायिक अधिकारी यांची कार्यशाळा असे कार्यक्रम राबविले जातात. |

<u>बाब क्रमांक २ </u>: <u>अधिका—यांचे व कर्मचा—यांचे अधिकार व कर्तव्ये</u>.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश | :१. जिल्हा न्यायालयांतर्गत तालुका, जिल्हा स्तरावर कार्यरत न्यायालयांचे कामकाजावर देखरेख करणेबाबत प्रशासनीक अधिकार. |
| | | २. एक कोटी पर्यन्तची आर्थिक मूल्य मर्यादा असलेल्या प्रकरणामधील दिवाणी न्यायाधीश क. स्तर व दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांनी दिलेल्या न्यायनिर्णय व हुकूमनाम्याच्या विरूध्दची अपीलाची प्रकरणेसुनावणी अंती न्यायनिर्णय देवून निकाली काढणे. |
| | | ३. न्यायदंडाधिकारी यांचेकडून वर्ग होवून आलेल्या सत्र खटल्यात पुराव्याअंती न्यायनिर्णय देणे. |
| | | ४. मोटार अपघात दावे न्यायाधिकरणाचे अध्यक्ष /पदसिध्द सदस्य म्हणून पहाणे तसेच दाखल झालेल्या मोटार अपघात नुकसान भरपाईच्या प्रकरणांचा सुनावणी अंती न्यायनिर्णय करणे |
| | | ५. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण म्हणून मोफत कायदेविषयक सल्ला देणे व मार्गदर्शन करणे, त्याकरिता शिबीरांचे योजन करणे तसेच दुर्बल घटकातील व्यक्तींना कायदेविषयक प्रकरणात मोफत अधिवक्त्याच्या सेवा उपलब्ध करून देणे. |
